संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाभोवती संरक्षक भिंत बांधणे व गोरेगाव येथे प्राणी संग्रहालयाची स्थापनेकरिता सलोह कॉंक्रीट भिंत बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्यूएलपी १०.१७/ प्र.क्र.२६५/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ३० नोव्हेंबर, २०१७.

<u>वाचा</u> :- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएससी-२०११/प्र.क्र.१७८/फ-५, दिनांक:- ३० सप्टेंबर, २०११.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक :- कक्ष-२४ / लेखा / प्र. क्र. ८७ / प्रमं / ६३३/ २०१७-१८, नागपूर. दिनांक :- १६.१०.२०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारामध्ये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांना रुपये २५.०० लाख पर्यंतच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भीय पत्रान्वये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाकरीता संरक्षण भिंत बांधकामाच्या २ उप अंदाजपत्रके व गोरेगाव येथील प्राणी संग्रहायलयाची स्थापनेकरीता सलोह क्राकीट भिंत बांधकामाच्या २ उप अंदाजपत्रके असे ४ उप अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे.

शासन निर्णय :-

१. आवश्यक असलेल्या अंदाजपत्रकात ४% अकस्मिक खर्च, ५% सेंटेज चार्जेस व १२% जीएसटी ची योग्य तरतूद करून रु. २,३२,६५,२३४/- रकमेच्या खालील तक्त्यातील ४ अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमतीने प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

अ.क्र.	तपशिल	अंदाजपत्रकीय रक्कम
१	संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,बोरीवली (पु) मुंबई करीता संरक्षण भिंत बांधकाम (आरे कॉलनी,प्राणी संग्रहालय, गोरेगाव) (तुलसी पाईप लाईन ते ट्राईबल हट) (CTS No.१६८९)	रु.५५,८२,२६३/-
२	संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,बोरीवली (पु) मुंबई करीता संरक्षण भिंत बांधकाम, (आरे कॉलनी, प्राणी संग्रहालय गोरेगाव) -(ट्राइबल हट (ईस्ट) ते मेटल क्रॉस रोड)	रु.५५,८२,२६३/-

३	संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,बोरीवली (पु) मुंबई करीता संरक्षण भिंत बांधकाम, (कोकाकोला कंपनी ते S.No.८४)	रु. ६०,५०,३५४/-
४	संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,बोरीवली (पु) मुंबई करीता संरक्षण भिंत बांधकाम, S.No.८५ते S.No.८८ (सुधांशु महाराज आश्रम)	रु. ६०,५०,३५४/-
	एकूण	रु. २,३२,६५,२३४/-

२. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाभोवती संरक्षक भिंत बांधणे व गोरेगाव येथे प्राणी संग्रहालयाची स्थापनेकरिता सलोह काँक्रीट भिंत बांधकामाच्या अंदाजपत्रकास खालील अटीस अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

अ) प्रस्तुत काम करताना आर्थिक बाबींस सक्षम प्राधिकाऱ्यांची तसेच अंदाजपत्रकास सक्षम अभियंत्यांची तांत्रिक मंजूरी घ्यावी.

आ) काम करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्कबाबतची खात्री करावी.

इ) अंदाजपत्रकासोबत जोडण्यात आलेले संरक्षक भिंतीचे नकाशे व संकल्पन सक्षम अधिकाऱ्याकडून साक्षांकित करुन घ्यावे.

सदरचा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौचारीक संदर्भ क्रमांक ४९४/ इमा-३, दिनांक १५.११.२०१७ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा सांकेतांक २०१७१२०२११४८४६३४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2017.12.02 11:52:44 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई.
४. मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली.
५. महालोखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
६. सार्वजनिक बांधकाम विभाग(इमारत-३), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
७. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
८. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
९. फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
१०. कार्यासन फ-१ महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ (निवडनस्ती)